# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dte.org.in


**By Post/ Mail**

क्रमांक :-१५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी मु.वा./२०१६-१७/ ९६e
दिनांक :- 1 7 DEC 2016

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:-१) "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत

संदर्भ :-१) उ. व तं.शि. विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टों., २०१६.
२) या संचालनालयाचे पत्र क्र.: १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसीऑनलाईन/२०१६-१७/१७०, दि. ०२.१२.२०१६

उपरोक्त विषयाबाबत सदर्भ क्र. २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" "ऑनलाईन" पध्दतीने अर्ज भरतांना विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे मुदतीत अर्ज भरू शकले नाहीत. याबाबत संस्थानी तसेच विभागीय कार्यालयांमार्फत योजनेच्या मुदत वाढीबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने विषयाकिंत **योजनेकरिता संस्था, महाविद्यालये व विद्यापीठा मधील विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी दि. २३/१२/२०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे. तसेच सस्थांकडून अर्जाची संपुर्ण छाननी करून आकडेवारी विद्यार्थ्यांच्या अर्जासह अहवाल सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना दि. १५ जानेवारी २०१७ पर्यंत सादर करावे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जाची छाननी विभागीय कार्यालय स्तरावर समिती गठीत करून अहवाल या तत्रशिक्षण संचालनालयास दि. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत सादर करण्यात यावा.**

त्यासाठी सर्व सूचना/परिपत्रक संबंधीत संस्थांनी/विद्यापीठांनी सूचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावेत. तसेच सदरहू सूचना विद्यार्थ्यांना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत दयावी. संस्था/ महाविद्यालय/ विद्यापीठ मधील कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या /महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांनी घ्यावी. जर विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या/महाविद्यालयाच्या/ विद्यापीठाच्या प्रमुखांची राहील, असे आपल्या स्तरावरून संस्थांना कळविण्यात यावे.

सहसंचालक तंत्रशिक्षण ... नागपूर
... 8684
14 DEC 2016

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक -३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता